# पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/बांधकाम/२३२१/प्र.क्र.०२/ 2098 /२०२३

दिनांक - १६/ ५ /२०२३

## आदेश

प्रति,
मे. पारस इन्फ्रा,
३०१, संकल्प को.ऑ.हौ.सो लि.,
रोकाडीया क्रॉस लेन, बोरीवली वेस्ट,
मुंबई- ४०० ०९२

कामाचे नाव :- पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रॉ.क्र. १०३३ अ मध्ये समाज मंदिर बांधणे.
(निविदा क्र.पमपा/श.अ./९७/२०१८-१९)

विषय :- निविदा सादर करणेस बंदी करणेबाबत.

संदर्भ :- १. कार्यादेश क्र.पमपा/महा/श.अ./४६७/२०१९ दि.२०/०२/२०१९
२. पमपा/बांधकाम/२३२१/प्र.क्र.०२/१४४९(१)/२०२१ दि.१३/०८/२०२१
३. पमपा/बांधकाम/२३२१/प्र.क्र.०२/१९७३/२०२२ दि.०३/०८/२०२२
४. पमपा/बांधकाम/२३२१/प्र.क्र.०२/२८९०/२०२२ दि. ११/११/२०२२
५. आपला दिनांक १६/११/२०२२ रोजीचा खुलासा.
६. दिनांक २१/०२/२०२३ रोजी शहर अभियंता यांच्या दालनात झालेली सुनावणी.

ज्याअर्थी, वरील संदर्भ क्र.१ नुसार पनवेल महानगरपालिकेने प्रॉ.क्र.१०३३ अ मध्ये समाज मंदिर बांधण्याचा आपणांस कार्यादेश दिला, आणि

ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिकेने वारंवार पत्र व्यवहार करुन ही काम संथ गतीने सुरु असल्याबाबत पत्र क्र.२,३ व ४ वर नमूद संदर्भानुसार आपणांस निर्देशनास आणून दिल्यानंतर ही आपण सदर काम करण्याचा गती वाढविला नाही व काम पूर्ण केले नाही, आणि

ज्याअर्थी, सदंर्भ क्र.३ नुसार आपणांस सदर कामाच्या कार्यादेशा मधील शिल्लक असलेले काम Risk & Cost वर का करुन नये याबाबत खुलासा मागितला, आणि

ज्याअर्थी, संदर्भ क्र.४ नुसार आपणांस काळ्या यादीत का टाकू नये ? याबाबत नोटीस बजावून खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते, आणि

ज्याअर्थी, संदर्भ क्र.५ नुसार खुलासा प्राप्त झाला असून खुलाश्यानुसार आपण १५ दिवसात काम पूर्ण करुन देऊ व आपणांस काळ्या यादीत टाकू नये याबाबत केलेली विनंती आयुक्तांनी अमान्य केली आहे व आपणांस आपली बाजु मांडण्याकरीतां आपणांस पुरेशी संधी देणेत आली आहे, आणि

ज्याअर्थी, संदर्भ क्र.६ नुसार शहर अभियंता यांच्या दालनात झालेल्या सुनावणीत आपण आपल्या म्हणण्यानुसार तुंम्ही केलेल्या कामाचे देयक मिळाले नाही व तुमच्या संस्थेची कोरोना काळात आर्थिक



Scanned with CamScanner

परिस्थिती खालावलेली असल्यामुळे काम करणे शक्य झाले नाही, परंतु आपणास वेळोवेळी देयक अदा करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आपले म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही व ते अमान्य करणेत आले आहे.

त्याअर्थी, आपणांस उपरोक्त नमूद प्राप्त अधिकारानुसार मे. पारस इन्फ्रा, बोरीवली वेस्ट, मुंबई यांना पुढील ०२ वर्ष कालावधी करीता पनवेल महानगरपालिकेच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवण्यास बंदी घालण्यात येत असून सदर कालावधी करीता मे. पारस इन्फ्रा, बोरीवली वेस्ट, मुंबई यांचा पनवेल महानगरपालिकेच्या काळ्या यादी मध्ये समावेश करण्यात येत आहे.

(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

प्रत माहितीस्तव –

१. अतिरिक्त आयुक्त-१, पनवेल महानगरपालिका.
२. शहर अभियंता, पनवेल महानगरपालिका.
३. संगणक विभाग, महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे.
४. सर्व विभाग, पनवेल महानगरपालिका.



Scanned with CamScanner